


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**



● वर्ष : ०२ ● अंक : ०३७ ● पुणे ● बुधवार, दि. १८ डिसेंबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



कॅन्सर सेंटरचे कल्याणी नगर येथे लोकार्पण 3




आनंद व सन्मान देणारा 'जल्लोष' कार्यक्रम 4

## ठळक बातम्या



### उद्धव ठाकरे-देवेंद्र फडणवीस एकत्र

**मुंबई : (आरंभ पर्व)** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नागपुरात भेट घेतली. राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला कालपासून उपराजधानी नागपुरात सुरुवात झाली आहे. दुसऱ्या दिवशी आज विधानपरिषद आमदार उद्धव ठाकरे हे अधिवेशनासाठी सभागृहात उपस्थित होते. नागपुरातील हिवाळी अधिवेशनात आज उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यानंतर सर्वांच्या भुवया उंचावल्यात. नागपुरातील मुख्यमंत्री दालनात उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी फडणवीसांची भेट घेतली. बंद दरवाज्या आड दोन्ही नेत्यांमध्ये 6-7 मिनिटं चर्चा झाली. त्यानंतर उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेतली. पण नार्वेकरांच्या कार्यालयाकडे जाण्यापूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं कार्यालय होतं. पण उद्धव ठाकरे यांनी त्या दिशेला तोंड करूनही पाहिलं नाही.

# दादांच्या फोटोला जोडे

## भुजबळ समर्थकांचा पुण्यात संताप; कसला वादा अन् कसला दादा : छगन भुजबळांनी अजित पवारांचं सगळंच काढलं




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मंत्रिमंडळ विस्तारात यादीतील नाव कापल्याच्या रागातून गेल्या दोन दिवसांपासून राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळअजित पवार आणि प्रफुल्ल पटेल यांच्यावर आगपाखड करत आहेत. भुजबळ यांनी नागपूरमधील हिवाळी अधिवेशन सोडून येवला गाठले असून तिथे कार्यकर्त्यांशी बोलून निर्णय घेणार असल्याचे स्पष्ट केले आहे. या काळात भुजबळ यांनी लोकसभा निवडणुकीत उमेदवारीच्या राजकारणापासून ते राज्यसभेची जागा सुनेत्रा पवारांना देण्यापर्यंतचे सगळेच विषय बाहेर काढले आहेत. तसेच विधानसभेला लढायला लावून आता राज्यसभेवर जायला सांगत असल्याची टीका केली आहे. कसला दावा आणि कसला वादा, असेही वक्तव्य भुजबळ यांनी केल्याने राष्ट्रवादीत चांगलाच वाद रंगल्याचे चित्र आहे.

अशातच पुण्यात भुजबळ समर्थक आणि राष्ट्रवादी कार्यकर्त्यांचे वाद होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. भुजबळ समर्थक ओबीसी कार्यकर्त्यांनी अजित पवारांच्या फोटोवर जोडे मारो आंदोलन केले आहे. यावरून राष्ट्रवादीतून संतप्त प्रतिक्रिया येत आहेत. जशास तसे उत्तर दिले जाईल नाही ते उद्योग करू नका नाहीतर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा पुणे शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी दिला आहे.

अजित पवारांविरोधात जोडे मारो आंदोलन केल्याने राष्ट्रवादी नेते आक्रमक झाले आहेत. राष्ट्रवादीचे नेते जशासतसे उत्तर देण्याची तयारी करत आहेत. नको ते उद्योग करू नका नाहीतर परिणामांना सामोरे जावे लागेल, असे त्यांनी ओबीसी कार्यकर्त्यांना सुनावले आहे.

### जे असे करतील ते समता परिषदेचे नाही - भुजबळ

दरम्यान, जोडे मारो आंदोलनावर भुजबळांनीही कार्यकर्त्यांना शांत राहण्याचे आवाहन केले आहे. मागच्या दोन दिवसापासून सांगत आहे अजित पवार यांच्या पुतळ्याला जोडे मारू नका, अपशब्द वापरु नका. आपल्या भावना शांततेत व्यक्त करा. जे असे करतील ते समता परिषदेचे नाही, असे भुजबळ म्हणाले आहेत.

### पेहराव करून गोव्याला गेलो

बेळगाव सत्याग्रहाला बाळासाहेब ठाकरे यांनी मला पाठवले होते. कर्नाटकात शिवसेनेचा राग होता. सगळीकडे चेकिंग सुरू होती, मी मुंबईत आलो. चेहऱ्याला दाढी लावली, हाती शबनम घेतली आणि गोव्याला गेलो. मुस्लिम माणसाचा पेहराव करून घेतला. गोव्यात काही कार्यकर्ते भेटले, तेथून मी कर्नाटकमध्ये गेलो. ज्या ज्या वेळी आदेश झाला त्यावेळी मी काम केले, असं म्हणत छगन भुजबळ यांनी आपल्या कार्याचा आलेख समर्थकांसमोर मांडला आहे.

## नृत्य प्रशिक्षकाकडून बालिकेशी अश्लील कृत्य

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वारजे माळवाडी भागातील एका नामवंत शाळेतील नृत्य प्रशिक्षकाने चार वर्षांच्या बालकेशी अश्लील कृत्य केल्याचा प्रकार उघडकीस आला. या घटनेनंतर संतप्त पालकांनी शाळेच्या प्रशासनाला जाब विचारून कारवाईची मागणी केली. याप्रकरणी पोलिसांनी रात्री उशिरा नृत्य प्रशिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. या घटनेनंतर पालकांनी बुधवारी (18 डिसेंबर) शाळा बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे. समाज माध्यमातून संदेश पाठवून शाळेत जमण्याचे आवाहन पालकांकडून करण्यात आले आहे.



नृत्य प्रशिक्षकाने चार वर्षांच्या बालिकेशी अश्लील कृत्य केल्याचा प्रकार मंगळवारी उघडकीस आला. याबाबत बालिकेने पालकांकडे तक्रार केली.

या घटनेनंतर पालकांनी शाळेच्या प्रशासनाला जाब विचारला. नृत्य प्रशिक्षकाला शाळेतून काढून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आल्याचे संबंधित शाळेने स्पष्ट केले.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांकडून याप्रकरणाची चौकशी करण्यात आली. त्यानंतर याप्रकरणी गुन्हा दाखल करून नृत्य प्रशिक्षकाला अटक करण्यात आली, अशी माहिती परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी दिली.




# "लोणावळा गॉट टॅलेंट"चे आयोजन

**लोणावळा (दै. आरंभ पर्व)**

लोणावळा महिला फाउंडेशन तर्फे हिल स्टेशनवर "लोणावळा गॉट टॅलेंट - गो व्होकल फॉर लोकल" कार्यक्रमांतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन केले गेले. हिल स्टेशनसाठी पहिली सौंदर्य स्पर्धा "मिसेस लोणावळा 2024" सुरु केली. याशिवाय स्थानिक सपर्धकांच्या पाककलेच्या कौशल्याला व्यासपीठ मिळावे यासाठी "फूड फेस्टिव्हल" चे आयोजन करण्यात आले होते. तसेच उत्साहात भर टाकण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांसहित सर्व वयोगटांसाठी, "समूह नृत्य स्पर्धे" चे आयोजन केले गेले. या स्पर्धेत स्थानिक नृत्यगटांनी आपल्या नृत्यकौशल्याने मंच गाजवला. कार्यक्रमाच्या मुख्य आकर्षणांपैकी एक म्हणजे प्रसिद्ध भारतीय अभिनेत्री तनिशा मुखर्जी आणि योग प्रशिक्षक बॉस्की त्रिपाठी यांची उपस्थिती. या दोन यशस्वी महिलांनी सौंदर्य स्पर्धा व नृत्य स्पर्धेच्या परीक्षक मंडळाचे नेतृत्व केले आणि विजेत्यांचा मुकुट घालून सन्मान केला.



मिसेस लोणावळा 2024 ही स्पर्धा फाउंडेशनच्या स्थानिक महिलांच्या आत्मविश्वास, सौंदर्य आणि सशक्तीकरणाचे प्रतीक आहे. विवाहित महिलांच्या कर्तृत्वाला आणि सौंदर्याच्या नवीन संकल्पनांना मान्यता देत या स्पर्धेला स्थानिक लोकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

सर्व फेऱ्याअंती "मिसेस राणी लोकेगावकार" यांनी मिसेस लोणावळा 2024 चा मान पटकावला तर "मिसेस अनुसया शेट्टी" यांनी प्रथम उपविजेतेपद व "मिसेस स्नेहल पाटील" यांनी द्वितीय उपविजेतेपद मिळवले.

मिसेस लोणावळा सीनियर सिटीझन 2024 या श्रेणीत ज्येष्ठ सहभागींच्या सौंदर्य आणि कर्तृत्वाला गौरवण्यात आले, ज्यामध्ये मिसेस शोभा मंधारे यांनी विजेतेपद मिळवले. मिसेस सरोज गोयल यांना प्रथम उपविजेत्या म्हणून घोषित करण्यात आले, तर मिसेस हेमलता अग्रवाल यांना दुसऱ्या उपविजेत्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अत्युत्कृष्ट महिलांसाठी विशेष श्रेणी देखील होती ज्याद्वारे असामान्य योगदान देणाऱ्या महिलांना सन्मानित करण्यात आले, ज्यात मिसेस "ज्योती रंगाणे" यांना त्यांच्या प्रेरणादायी कर्तृत्वासाठी विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मिस लोणावळा 2024 या श्रेणीत, "लब्धी लालवाणी" यांनी आपल्या आकर्षक भूमिका आणि आत्मविश्वासाने विजेतेपद पटकावले.

भारतीय अभिनेत्री आणि पर्यावरणप्रेमी तनिशा मुखर्जी यांनी म्हटले, "लोणावळा महिला फाउंडेशनच्या या उपक्रमाने महिलांना त्यांची वेगळी ओळख निर्माण करण्याची व त्यांचे अनोखेपण साजरे करण्यासाठी एक व्यासपीठ तयार केले हे पाहून मला खूप आनंद झाला. मिसेस लोणावळा स्पर्धा, समूह नृत्य स्पर्धा आणि फूड फेस्टिवलचा साक्षीदार होणे माझ्यासाठी खरचं सन्मानाचे होते.

तसेच प्रत्येक सहभागी इथे विजेता आहे."

लोणावळा महिला फाउंडेशनच्या संस्थापक सौ. ब्रिंदा गणात्रा म्हणाल्या, "व्होकल फॉर लोकल" हे आमचे ब्रीदवाक्य आहे आणि लोणावळा महिला फाउंडेशन, स्थानिक महिलांना त्यांचे कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कायम वचनबध्द आहोत. मिसेस लोणावळा सौंदर्यस्पर्धा केवळ सौंदर्याचा उत्सव नसून, महिलांच्या आत्मविश्वास, धैर्य आणि वेगळेपणाचा सन्मान आहे. प्रत्येक सहभागीने दाखवले आहे की, एक महिला होणे म्हणजे प्रत्येक भूमिका आत्मविश्वासाने आणि आदरपूर्वक निभावणे होय. तनिशा मुखर्जी आणि बॉस्की त्रिपाठी यांचे प्रेरणादायी समर्थन आणि उपस्थितीसाठी आम्ही त्यांचे आभारी आहोत.

प्रसिद्ध योग प्रशिक्षक बॉस्की त्रिपाठी म्हणाल्या, "लोणावळा महिला फाउंडेशनचा स्थानिक कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी 'लोणावळा गॉट टॅलेंट' व्यासपीठ निर्माण करण्याचा उपक्रम मला खूप प्रेरणादायी वाटला. मिसेस लोणावळा सौंदर्यस्पर्धा ही महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यास मार्गदर्शन करते. सहभागी महिलांना माझा संदेश आहे की, आपल्या प्रवासाला संतुलन, स्थिरता आणि सकारात्मकतेच्या मार्गदर्शनाने पुढे न्या. तुम्ही सर्व स्वतःला यात सहभागी करून घेऊन आधीच विजयी झाल्या आहात."





# नव्या सरकारचे स्वागत करू या...!

महाराष्ट्रात 20 डिसेंबरला विधानसभेच्या 288 जागांसाठी मतदान झाले, 23 डिसेंबरला झालेल्या मतमोजणीत महायुतीचे 230 आमदार विजयी झाले. दि. 5 डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून आणि एकनाथ शिंदे व अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. विधिमंडळाच्या नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्व संध्येला म्हणजेच 15 डिसेंबर रोजी राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. 33 आमदारांनी कॅबिनेट मंत्री व 6 जणांनी राज्यमंत्री म्हणून शपथ घेतली. सरकार स्थापनेला खूपच विलंब झाला अशी टीका झाली. जनतेने महायुतीला प्रचंड बहुमत दिल्यानंतर मंत्रिमंडळ आणि खातेवाटप ठरवायला एवढा वेळ कशासाठी, हे समजले नाही. जुने आणि नवे चेहरे, जातीनिहाय आणि प्रादेशिक समतोल साधण्यासाठी वेळ लागला असावा. सरकारमध्ये जवळपास निम्मे मंत्री हे नवीन चेहऱ्यांचे आहेत. पण आता मंत्रिमंडळ विस्तारानंतर महायुतीत जे नैराश्य नाट्य चालू आहे ते मात्र महाराष्ट्राला भूषणावह नाही.

महायुतीमधील भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तीनही पक्षांत ज्यांना मंत्री होता आले नाही अशा नेत्यांची घालमेल होते आहे. आपण मंत्री झालो नाही, हे त्यांना सहन झालेले नाही. कोणी चिडून बोलत आहे, कुणी पक्षाच्या नेत्यावर नाराजी प्रकट करीत आहे, कुणी नागपूरच्या अधिवेशनाला न थांबता सरळ मतदारसंघातील आपल्या घरी निघून गेले, तर कुणी टीव्हीच्या कॅमेरापुढे आपल्या मनातील खदखद व्यक्त करताना दिसत आहे. राज्यात यशवंतराव चव्हाणांपासून आज देवेंद्र फडणवीसांपर्यंत तीसपेक्षा जास्त सरकारे सत्तेवर आली.

देवेंद्र यांनी तर मुख्यमंत्रीपदाची तिसऱ्यांदा शपथ घेतली. शरद पवार, वसंतदादा पाटील यांनीही चार-चार वेळा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. पण गेल्या सहा दशकांत सरकार स्थापनेनंतर आपण मंत्री झालो नाही किंवा आपला पत्ता कापला गेला म्हणून कुणी एवढा थयथयाट केला नव्हता. आमदार म्हणून निवडून आलेल्या प्रत्येकाला मंत्री होण्याची महत्त्वाकांक्षा असणे यात गैर काही नाही, पण गेल्या सरकारमध्ये आपण मंत्री होतो म्हणून नव्या सरकारमधेही मंत्रीपद मिळालेच पाहिजे हा हट्ट आता वाढत चालला आहे. आमदार म्हणून निवडून आल्यावर मंत्रीपद मिळाले पाहिजे, अशी महत्त्वाकांक्षा बळावत चालली आहे. टीव्हीच्या कॅमेरासमोर बोलताना, आपल्याला मतदारसंघाच्या विकासासाठी मंत्रीपद पाहिजे असे इच्छुक सांगत असतात. पण त्याचबरोबर त्याला मंत्री का केले व मला का केले नाही, असा प्रश्न विचारत असतात. आता कुणी थांबायला तयार नाही, हे असंतोषाचे प्रमुख कारण आहे. काँग्रेसने महाराष्ट्रावर सर्वाधिक काळ सत्ता उपभोगली आहे.

सर्वाधिक मुख्यमंत्री काँग्रेसने दिले आहेत. त्या काळात मुख्यमंत्री व सरकारमधील मंत्री यांची नावे दिल्लीहून काँग्रेस श्रेष्ठी पाठवत होते. आता काळ बदलला आहे. आता भाजपा व मित्रपक्षांच्या मंत्र्यांच्या नावावर भाजपा हायकमांडचे शिक्कामोर्तब होणे गरजचे असते.

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात मित्रपक्षांच्या उमेदवारांना भाजपाने आक्षेप घेतल्यावर मित्रपक्षांना त्यांचे उमेदवार बदलावे लागले होते. आता नव्या सरकारमध्ये मंत्री कोण ठरवताना भाजपा हायकमांडची एनओसी असल्याशिवाय नावे निश्चित होत नाहीत. मग आपल्याला मंत्रीपद मिळाले नाही म्हणून वगळलेले व डावललेले नेते का भोकाड पसरत आहेत? ज्यांना वगळले ते तूर्त काहीही करू शकत नाहीत, जे मिळवायचे ते भाजपा श्रेष्ठींच्या मर्जीनुसारच मिळणार आहे, याचे भान ठेवले पाहिजे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमधील बारा मंत्र्यांना देवेंद्र फडणवीस यांच्या नव्या सरकारमध्ये डच्चू मिळाला आहे. हे 12 जण असंतुष्ट आहेत हे लपून राहिलेले नाही. सर्वात जखमी झाले ते छगन भुजबळ. आजवर ते सात वेळा आमदार म्हणून निवडून आले. (राष्ट्रवादी काँग्रेस, येवला, नाशिक) मंत्रीपदे आली व गेली, पण भुजबळ कधीच संपला नाही. मला डावलल्याने मला काही फरक पडणार नाही, जरांगे पाटलांना अंगावर घेतलं, त्याचं बक्षीस मिळालं ना. मी सामान्य कार्यकर्ता. मला डावललं काय नि फेकलं काय, मला अजित पवारांशी बोलण्याची गरज वाटली नाही. मी म्हणजे काय खेळणं आहे का? माझं मंत्रीपद कुणी नाकारलं हे शोधावं लागेल. इति भुजबळ. भुजबळांचा संताप प्रकट झाल्यावर सोशल मीडियावरून धुवांधार प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. अगोदर बाळासाहेबांना सोडले, नंतर काँग्रेस सोडून शरद पवारांची साथ घेतली, नंतर त्यांनाही सोडले. देवेंद्र फडणवीसांची 2014 ते 2019 ही कारकीर्द वगळता भुजबळ 1999 पासून राज्यात सरकारमध्ये आहेत.

मनी लॉड्रिंग प्रकरणात ते 26 महिने जेलमध्ये होते. समता परिषद व ओबीसी समाज हे त्यांच्याकडे प्रभावी हत्यार आहे. मंडल आयोगाच्या मुद्द्यावरून त्यांनी बाळासाहेबांची शिवसेना सोडली तसेच मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्यास उघडपणे त्यांनी विरोध केला. विधानसभा निवडणुकीत नांदगावमधून ते त्यांचा पुतण्या समीरची बंडखोरी रोखू शकले नाहीत.

शिवसेनेत असताना नेते, महापौर, आमदार, मंत्री. राष्ट्रवादीत असताना प्रदेशाध्यक्ष, गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी सारी ताकदवान पदे त्यांनी उपभोगली. अजितदादांच्या पक्षातही ते नंबर दोन होते. आता त्यांना म्हणे राज्यसभेवर पाठवणार, अशा चर्चेला उधाण आले आहे.

भाजपाचे दिग्गज नेते सुधीर मुनगंटीवार (भाजपा, बल्लारपूर) यांना सरकारमधून वगळल्याने ते खूप अस्वस्थ आहेत. विद्यार्थीदशेपासून ते संघ स्वयंसेवक, 1995 पासून भाजपामध्ये सक्रिय, संघटनेत विविध पदांवर काम केले, पक्षाचे प्रदेशाध्यक्षही झाले. मला मंत्रीपद देणार नाही, असे कुणीही सांगितले नव्हते. मंत्रीपद नाकारण्याचं कारण काय, याचा मी विचार करतोय, मी नाराज नाही. मनाविरुद्ध घडत असताना जो काम करतो तो कार्यकर्ता, असे ते सांगत आहेत. रवींद्र चव्हाण (भाजपा, डोंबिवली) यांना मंत्रीपद न मिळाल्याने अनेकांना आश्चर्य वाटले. देवेंद्र फडणवीसांचे ते विश्वासू. तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले. सार्वजनिक बांधकाम खाते त्यांनी संभाळले. एकनाथ शिंदेंचे वर्चस्व असलेल्या ठाणे जिल्ह्यात पक्षाचे काम त्यांनी निष्ठेने केले. विशेष म्हणजे त्यांनी किंचितही नाराजी व्यक्त केली नाही. चंद्रशेखर बावनकुळे यांना मंत्रीपद दिल्याने पक्षाचे प्रदेशाध्यक्षपद चव्हाण यांना दिले जाईल अशी चर्चा आहे. विजय शिवतारे कमालीचे संतप्त झाले. ते म्हणाले, मंत्रीपद महत्त्वाचं नाही, पण मला वाईट वागणूक मिळाली, याचे जास्त वाईट वाटले.

# परेश मोकाशी दिग्दर्शित 'मु. पो. बोंबीलवाडी'चा ट्रेलर प्रदर्शित

## 'मु. पो. बोंबीलवाडी' १ जानेवारी २०२५ रोजी होणार प्रदर्शित

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

प्रशांत दामले हिटलर, आनंद इंगळे चर्चिलच्या तर वैभव मांगले, गीतांजली कुलकर्णी, सुनील अभ्यंकर, मनमित पेम, प्रणव रावराणे, गणेश मयेकर,रितिका श्रोत्री, अद्वैत दादरकर इतर महत्वाच्या भूमिकांमध्ये

विवेक फिल्म्स, मयसभा करमणूक मंडळीकृत परेश मोकाशीलिखित-दिग्दर्शित आणि मधुगंधा कुलकर्णी व दिलीप शितोळेनिर्मित 'मु. पो. बोंबीलवाडी'चा ट्रेलर आज मुंबईत येथे प्रदर्शित करण्यात आला. 'मु. पो. बोंबीलवाडी' 1 जानेवारी 2025 रोजी प्रदर्शित होत असून त्यामुळे नवीन वर्षाची सुरुवात धमाल विनोदाने होणार आहे. चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक आणि कलाकारांच्या उपस्थितीत ट्रेलरचे प्रदर्शन झाले.




विवेक फिल्म्स् आणि मयसभा करमणूक मंडळीकृत 'मु. पो. बोंबीलवाडी'ची निर्मिती मधुगंधा कुलकर्णी, भरत दिलीप शितोळे यांची असून लेखन आणि दिग्दर्शन परेश मोकाशी यांचे आहे. पटकथा आणि संवाद परेश मोकाशी यांनीच लिहिले आहेत. संगीत आणि पार्श्वसंगीत तन्मय भिडे यांचे आहे.

प्रशांत दामले हे चित्रपटात हिटलरच्या तर आनंद इंगळे चर्चिलच्या भूमिकेत आहेत. त्यांच्यासह वैभव मांगले, गीतांजली कुलकर्णी, सुनील अभ्यंकर, मनमित पेम, रितिका श्रोत्री, प्रणव रावराणे, अद्वैत दादरकर, गणेश मयेकर, दीप्ती लेले, राजेश मापुस्कर हे चित्रपटसृष्टीतील आघाडीचे कलाकार चित्रपटात झळकणार आहेत.

हरीश्चंद्राची फॅक्टरी, एलिझाबेथ एकादशी, वाळवी या तीन मराठी चित्रपटांना मिळालेल्या राष्ट्रीय पुरस्कारांच्या हॅटट्रिकनंतर येणारा लेखक-दिग्दर्शक परेश मोकाशी आणि निर्माती मधुगंधा कुलकर्णी यांचा हा चित्रपट आहे. मोकाशी यांची विनोदाची पठडी आणि त्यांच्या 'मु. पो. बोंबीलवाडी' नावाच्याच नाटकावर बेतलेल्या या चित्रपटाकडून रसिकांच्या आशा खूप उंचावल्या आहेत. त्यातच चित्रपटात तगडी स्टारकास्ट असल्यानेही प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पोहचली आहे. त्यातच ट्रेलरमध्ये अनेक गमतीशीर प्रसंग समोर येतात. हिटलरच्या भूमिकेतील प्रशांत दामले आणि इतरांच्या तोंडी धमाल संवाद आहेत आणि त्याची झलक या ट्रेलरमध्ये दिसते.

दाढी करत असलेला हिटलर ती करणाऱ्याशी जर्मनमध्ये बोलतो, तर पार्श्वभूमीवर आवाज येतो, "परदेशी पात्रेही आता मराठीत बोलतील." हिटलर म्हणतो, "माझ्या डिक्शनरीत प्रोब्लेम हा वर्ड नाही." त्यावर पुन्हा आवाज येतो, "शुद्ध मराठीत!" दुसऱ्या फ्रेममध्ये चर्चिल स्वतःचे नाव घेतो, तर त्यालाही शुद्ध मराठीत बोलण्याच्या सूचना दिल्या जातात. "विन्स्टन चर्चिल नाव आहे माझे, ते मराठी कसे बोलणार?" असा प्रश्न चर्चिलला पडतो.

ट्रेलरमधील दुसऱ्या एका दृश्यात हिटलर म्हणतो, "जपानने महत्वाचा शोध लावेलेला आहे, मी स्वतः जपानला विमान चालवत जाणार आहे, तुम्ही येताय जपानला." सहकाऱ्यांना विचारलेल्या या प्रश्नावर एक म्हणतो, "मला विमान लागते." दुसरा म्हणतो, "माझे धडे बसतात."तिसऱ्या एका प्रसंगात हिटलरचे पिस्तुल मिळाल्याचा संवाद आहे. "हिटलर मेला असेल तर?," एकाची शंका. तर दुसरे पात्र म्हणते, "तार पाठवली पाहिजे जर्मनीला, हिटलर सिरीयस स्टार्ट इमेडीएटली!" आणखी एका प्रसंगात नाटकाची रिहर्सल चालली आहे. "तिकडे हिटलर-चर्चिल जगाची भादरत आहेत. इथे तुम्ही या नाटकाची भादरत आहात."

एका प्रसंगात तीन हिटलर समोरासमोर येतात आणि ओळख पटविण्यासाठी एकमेकाची परीक्षा घेतात. आणखी एका प्रसंगात हिटलर-चर्चिल सामोरासामोरे येतात. अशी धमाल दृश्ये आणि प्रसंग चित्रपटाची धाटणी स्पष्ट करतातच पण चित्रपटाबद्दल कुतूहलही वाढवतात. मोकाशी यांच्या आत्तापर्यंतच्या चित्रपटांप्रमाणेच 'मु. पो. बोंबीलवाडी'सुद्धा वेगळे आणि धमाल मनोरंजन देणार, याविषयीची खात्री या ट्रेलरच्या माध्यमातून पटते.

चित्रपटाची घोषणा झाल्यापासूनच 'मु. पो. बोंबीलवाडी'बद्दल प्रेक्षकांना उत्कंठा लागून राहिली होती. आधी 'कोण होणार हिटलर?' ही उत्सुकता होती आणि त्याचे उत्तर मिळाल्यावर ती अधिक वाढत गेली. त्यानंतर चित्रपटाचे प्रमोशनल साँग अर्थात प्रसारगीत प्रदर्शित झाले आणि या 'कॉपीराइट फ्री' गाण्याने धमाल उडवून दिली.

त्याआधी चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रदर्शित झाले होते. काही वर्षांपूर्वी आलेल्या आणि प्रचंड गाजलेल्या याच नावाच्या नाटकाचे हे चित्रपटीय स्वरूप आहे. रसिकांच्या मागणीवरून ही चित्रपट निर्मिती संहितेत काही बदल करून केली गेली आहे.

## थोडक्यात



### राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन साजरा

**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** उरुळी कांचन येथील महात्मा गांधी सर्वोदय संघ संचलित पद्मश्री मणिभाई देसाई महाविद्यालयामध्ये भूगोल विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी आणि ऊर्जेचा वापर कमी करून ऊर्जेची बचत करण्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी भित्तीचित्र प्रदर्शन आयोजित करून राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी बोऱ्हाडे यांनी फित कापून भित्तिचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी ऊर्जा संवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. येणाऱ्या पिढीसाठी ऊर्जा संवर्धन करणे आणि ऊर्जेचा योग्य वापर करणे महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले .उपप्राचार्य डॉ. अविनाश बोरकर यांनी राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन साजरा करण्यासंबंधी विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख प्रा. सारिका ढोणगे यांनी केले तर आभार प्रा. झेबा तांबोळी यांनी मानले. सूत्रसंचालन स्वाती शिंदे हिने केले. या कार्यक्रमास प्रा. नंदकिशोर मेटे, प्रा. अनुप्रिता भोर, प्रा. शुभांगी रानवडे, प्रा. वैशाली चौधरी, प्रा.प्रियंका गोलांडे, प्रा. ऐश्वर्या जाधव प्रा. सुमेघ बडेकर तसेच कार्यालयीन अधीक्षक प्रदीप राजपूत व विद्यार्थी उपस्थित होते.



### रस्ता सुरक्षेत डेना इंडियाचे योगदान

**पुणे (आरंभ पर्व) :** चाकणस्थित 'डेना इंडिया' या कंपनीने पुण्यातील अपघातप्रवण क्षेत्रांत रस्ता सुरक्षा आणि पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी 'सीएसआर'च्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले. त्या अंतर्गत चाकणमधील आळंदी फाटा चौक येथे 30 सौरदिवे बसविण्यात आले. या नवीन हायमास्ट दिव्यांमुळे दृश्यमानतेत सुधारणा होऊन अपघातांचा धोका लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. रस्ते अपघातात घट व्हावी, यासाठी कंपनीने चाकण या औद्योगिक परिसरात सुरक्षाफलक लावले आणि धातूचे बॅरिकेड्स बसवले. याचा फायदा दररोज अंदाजे अडीच लाख नागरिकांना होत आहे. याशिवाय एंड्युरन्स चौकातील रस्ता विभाजकावर रेलिंग बसविण्यात आल्या. त्याचा फायदा तीन लाखांहून अधिक नागरिकांना झाला. कंपनीतर्फे चाकण औद्योगिक क्षेत्र आणि एंड्युरन्स चौक या महत्त्वाच्या ठिकाणच्या पथदिव्यांमध्येही सुधारणा केली. "या उपक्रमांचा उपयोग चाकणमधील वाहतुकीची स्थिती सुधारून अपघातांवर नियंत्रण मिळविण्यासाठी होईल.

# स्वाधार योजनेसाठी 31 डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी 31 डिसेंबर 2024 पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली असून जिल्ह्यातील महाविद्यालयात व्यवसायिक, अव्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी सन 2024-25 या शैक्षणिक वर्षासाठी https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईनपद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी केले आहे. या संकेतस्थळावर अर्ज भरण्याची मुदत 16 डिसेंबर 2024 अशी देण्यात आली होती, तथापि आता ती वाढवून 31 डिसेंबर 2024 अशी करण्यात आली आहे. ऑनलाईन संकेतस्थळाचे प्रथम वर्ष असल्याने चालू वर्ष सन 2024-25 करीता व्यवसायिक अथवा अव्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्ज पोर्टलवरून डाऊनलोड करावे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी 31 जुलै 2024 पूर्वी थेट संबंधित वसतिगृहात ऑफलाईन अर्ज सादर केले असतील त्यांनीदेखील ऑनलाईन अर्ज संकेतस्थळावर भरावे. या अर्जांची प्रिंट घेऊन संबंधित वसतिगृहात किंवा सहाय्यक आयुक्त कार्यालयास ऑफलाईनरित्या सादर करावे.

# शिबिरात 268 रक्तदात्यांनी केले रक्तदान

**राजगुरुनगर(दै. आरंभ पर्व)**

राजगुरुनगर येथील राजगुरुनगर कामगार कृती समितीच्या वतीने पद्मश्री रतन टाटा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिरात 268 रक्तदात्यांनी केले रक्तदान केले. तसेच 41 महिलांची कर्करोग व इतर आरोग्यविषयक तपासणी करण्यात आली.

चाकण ब्लड बँक आणि इंद्रायणी कर्करोग रुग्नालय आळंदी, कामगार कल्याण मंडळ केंद्र चाकण आदी संस्थाही या शिबीरात सहभागी झाल्या होत्या. मूख कॅन्सर व महिलांना होणारे आजार आणि वाढते कर्करोगाचे प्रमाण ह्या




विषयी जनजागृती, विविध आजारांची लक्षणे व उपाय आजारांबाबत समज - गैरसमज याविषयी इंद्रायणी कर्करोग रुग्नालयाच्या डॉ. मंजिरी जोशी यांनी प्रबोधन केले.

यावेळी कामगार आयुक्त रविराज ईळवे, सुजाता ईळवे यांच्या हस्ते लेखक प्रकाश वीर यांनी लिहिलेल्या "संघटन :- नेतृत्व हक्क आणि संघर्षाची कहाणी " या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन चाकण येथील केंद्र संचालक अविनाश राऊत, समाज विकास केंद्र खेडचे अध्यक्ष भरत उढाणे यांनी केले. याप्रसंगी डॉ. ज्योती काकड, संतोष साठे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी विविध कंपन्यांचे संघटना प्रतिनिधी, कामगार व त्यांचे कुटुंबीय सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजन कृती समितीचे सदस्य प्रकाश पठारे, दत्ता दगडे, बाबा वाणी, कमलेश गावडे, रामदास सैंदाणे, गोकुळ भामरे, वैशाली उढाणे, पल्लवी अमराळे, शिवानी पठारे यांनी प्रयत्न केले.

# मालपाणीज् बेकलाईटने गाठला ऐतिहासिक टप्पा




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खाद्यप्रक्रिया आणि बेकरी क्षेत्रातील अग्रगण्य व विश्वासपूर्ण ब्रँड असलेल्या मालपाणीज् बेकलाईट ने एक ऐतिहासिक टप्पा गाठला असून कंपनीच्या 1999 स्थापना झाल्यापासुन 25 कोटी क्रिमरोल चे उत्पादन करून वेगाने वाटचाल करत आहे. बेकरी उद्योगक्षेत्रातील अग्रगण्य नाव असलेल्या पुण्यातील बेकलाईट फूड़ प्रोसेसिंग प्रा. लिमिटेड कंपनी ने बाजारपेठेत दोन दशकांपासून अधिक काळ कार्यरत आहे. ती ग्राहकांना पूर्णपणे शुद्ध शाकाहारी बेकरी उत्पादने पुरवते.

बेकरी क्षेत्रात 100 टक्के शुद्ध शाकाहारी उत्पादने उपलब्ध करून देण्याचे ध्येय घेऊन श्री. सचिन मालपाणी यांनी बेकरी व्यवसायात प्रवेश केला. अगदी आजही बेकरी उद्योग असंघटीत असून क्रिम रोल्स, खारी, टोस्ट, जीरा बटर अशी अनेक उत्पादने स्थानिक उत्पादक विकत आहेत. मात्र, या परिसराच्या अस्ताव्यस्त स्वरूपासोबतच स्वच्छतेचा अभाव, गुणवत्ता नियंत्रणाचा अभाव अशी समस्याही निर्माण झाली आहे. हे क्षेत्र प्रामुख्याने अंडी आणि मांसाहारी उत्पादने तसेच इतर बेकरी उत्पादनांची विक्री करणाऱ्या बेकरीद्वारे नियंत्रित केले जाते. यामुळे, शाकाहारी लोकांसाठी बेकरी उत्पादने खरेदी करण्याचे पर्याय खूपच मर्यादित झाले आहेत.

या यशाबद्दल मत व्यक्त करत मालपाणीज् बेकलाईटचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सचिन मालपाणी म्हणाले, क्रीम रोल फक्त डेझर्ट नसून आधुनिक विश्वातील समाधानाचे प्रतीक देखील आहे. शुध्द शाकाहारी उत्पादने लक्षात घेऊन आधुनिकता आणि परंपरेचा अनोखा मिलाफ असलेली उत्पादने भविष्यात बाजारात आणण्याची बेकेलाइटची योजना आहे. क्रीम रोल अद्वितीय स्वाद देण्यासोबत प्रसन्नतेचा अनुभव देतो आणि आपले मूळ व प्रियजनांशी असलेल्या संबंधाची आठवण करून देतो.

**बेकलाईट फूड प्रोसेसिंग प्रा. लिमिटेडबद्दल :** बेकलाईट फूड प्रोसेसिंग प्रा. लिमिटेड हे फूड इंडस्ट्रीतील एक अग्रगण्य नाव असून तिचे मुख्यालय पुण्यात आहे. उद्योजक श्री. सचिन मालपाणी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली 1999 मध्ये कंपनीची स्थापना झाली. मागील दोन दशकांहून अधिक काळ ती बाजारपेठेत सक्रिय आहे. या ब्रँडच्या अंतर्गत शुद्ध शाकाहारी उत्पादने उपलब्ध आहेत. दर्जेदार उत्पादने प्रदान करण्यावर त्याचा विश्वास आहे. तसेच आपल्यामध्ये सतत सुधारणा करण्यासाठी कंपनी कठोर परिश्रम घेते. हा ब्रँड केवळ बेकरी उत्पादनांपुरता मर्यादित राहिला नसून नमकीन स्नॅक्स श्रेणीमध्येही त्याचा प्रवेश झाला आहे. ही उत्पादने कठोर गुणवत्ता तपासणीतून जातात आणि अत्यंत स्वच्छ वातावरणात त्यांचे उत्पादन करण्यात येते. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो. पुण्यातील नऱ्हे येथील कारखान्यात सर्व उत्पादनांवर प्रक्रिया करून त्यांचे पॅकिंग करण्यात येते.

## गौडबंगाल

मतदान पत्रिका गेली आणि विद्युत मतदान यंत्र आली.
ज्यांनी यंत्रांना विरोध केला त्यांनीच त्याचा "वापर" केला.
ज्या केंद्रात तिनशे मतदान होते, तिथे सहाशे मतदान झाले.
आणि काही ठिकाणी तर खुद्द उमेदवाराचे मतच गहाळ झाले.
कोणाचे खात्रीशीर निवडुन येणारे उमेदवार पडले,
तर ज्यांची पगडी जप्त होणार होती ते बहुमताने निवडून आले.
मतदार राजा आणि सर्वसामान्य जनतेत चर्चा सुरू आहे,
कुठेतरी काहीतरी मोठं गोड बंगाल आहे.
पण कोणताही पक्ष, कोणताही उमेदवार या
विरोधात आवाज उठवताना दिसत नाही.
कारण त्यांना तो अधिकारच राहिलेला नाही.
कोणी स्वार्थासाठी, कोणी पाप लपवण्यासाठी इकडून तिकडे पळाले.
कोणी यांच्या वळचणीला लपले तर कोणी
त्यांच्या दावणीला तोंड घातले.
कोणी दिलेले शब्द फिरवले,
तर कोणी आणाभाका विसरले.
म्हणून आता खोटेपणाला विरोध करायला यांना तोंडच राहिले नाही.
पण सामान्य जनतेला या घडामोडींचा काहीच फरक पडत नाही.
पुराण काळापासून हे विधी लिखित आहे,
वरती राज्य कोणाचाही असो,
सामान्य जनतेला काहीच फरक नाही पडत.
अन्न वस्त्र निवा-यासाठी झटावेच लागते रडत झडत.
नेते आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना मात्र फरक पडतो.
मग जो तो विरोधातील लोकांना पाच वर्षे नडतो.
काही दिवस पुन्हा धुरळा उडतो,
पुन्हा पाच वर्षानंतर तेच दिवस येतात,
मग निवडणुका पत्रिकेवर घ्या किंवा यंत्रावर
घ्या काहीच फरक पडत नाही जनतेला.
मतदान करा, नका करू जावेच लागते कामाला!!
फक्त आता या प्रक्रियेतील सर्वांना एकच विनंती करतो,
निवडणूक जिंका किंवा हरा,
स्व स्वार्थ थोडासा बाजूला सारा, आणि देश हिताचे
जनकल्याणाचे काम पहिले करा....

साहित्यिक सर्पमित्र कवी-
खलिल महेमुद शेख, उरूळी कांचन, पुणे

### बॉल कॉर्पोरेशन आणि डाबरने पर्यावरणपूरक उपक्रमाचा भाग म्हणून अ‍ॅल्युमिनियम कॅनमध्ये

# रिअल बाइट्स ज्यूस लाँच करण्यासाठी भागीदारी केली आहे

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

शीतपेये, वैयक्तिक काळजी आणि घरगुती उत्पादनांसाठी टिकाऊ अ‍ॅल्युमिनियम पॅकेजिंगसाठी अग्रगण्य कंपनी असलेल्या बॉल कॉर्पोरेशनने, आज डाबर इंडिया लिमिटेडसोबत भागीदारी जाहीर केली आहे. डाबर ही 135 वर्षांपूर्वी स्थापन झालेली, भारतातील एक प्रतिष्ठित आणि दीर्घकालीन ग्राहकोपयोगी वस्तू उत्पादक कंपनी आहे. या भागीदारीद्वारे डाबरने त्यांचा रिअल ज्यूस पोर्टफोलिओ विस्तारण्यासाठी नवीन रिअल बाइट्स ज्यूस पूर्णपणे पुनर्वापर करता येणाऱ्या अ‍ॅल्युमिनियम कॅनमध्ये लाँच केले आहे. रियल बाइट्स ज्यूस प्रत्येक घोटामध्ये खऱ्या फळांच्या तुकड्यांसह पिण्याचा अनोखा अनुभव देतो.




2023 मध्ये भारतातील ज्यूस श्रेणीत आरोग्याबद्दल वाढत्या चिंतेमुळे, आरोग्यदायी पेयांवरील ग्राहकांचा कल वाढल्याने दुपटीने मजबूत वाढ नोंदवली गेली. सामाजिक प्रसंगांमध्ये ताजेतवाने पर्याय म्हणून ज्यूसच्या लोकप्रियतेने या श्रेणीच्या वाढीस चालना दिली. 2028 पर्यंत, नवीन फ्लेवर्स आणि नाविन्यपूर्ण उत्पादने यामुळे ज्यूस श्रेणीची विक्री 35 दशलक्ष लिटरने वाढण्याचा अंदाज आहे.

रिअल बाइट्स हे अ‍ॅल्युमिनियम कॅनमध्ये पीच, पाईनॅपल आणि रिअल ग्रीन अ‍ॅपल अशा उत्तम फ्लेवर्समध्ये उपलब्ध आहे. 185 मिलीलीटर चा कॅन हा या श्रेणीसाठी एक सुरुवातीचा पर्याय आहे, जो सोबत नेण्यासाठी सोयीस्कर आहे. ताज्या चवीसोबत, नवीन अ‍ॅल्युमिनियम कॅन एक वर्षापर्यंतचे शेल्फ लाईफ देतात, जे इतर पॅकेजिंग फॉरमॅट्सद्वारे दिल्या जाणाऱ्या चार ते नऊ महिन्यांच्या तुलनेत खूप जास्त आहे. यामुळे ग्राहक दीर्घकाळासाठी रिअल बाइट्सचा आनंद घेऊ शकतात, तसेच एक पर्यावरण-जागरूक पर्याय म्हणून निवड करू शकतात, कारण अ‍ॅल्युमिनियम कॅन हे जगातील सर्वाधिक पुनर्वापर केले जाणारे पेय कंटेनर आहेत.

श्री. मयंक कुमार, वाइस प्रेसिडेंट मार्केटिंग, डाबर इंडिया लिमिटेड यांनी या लाँचबाबत भाष्य करताना सांगितले, "रिअल मध्ये, आमचा उद्देश सतत नाविन्यपूर्ण उत्पादन सादर करणे आणि आमच्या ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करणे हा आहे. अ‍ॅल्युमिनियम कॅन्समध्ये रिअल बाइट्स सादर केल्यामुळे केवळ आमचा उत्पादन पोर्टफोलिओ विस्तारित होत नाही, तर अधिक टिकाऊ पॅकेजिंग आणि दीर्घ शेल्फ लाईफच्या मागणीची पूर्तता होते. आमच्या ग्राहकांना सोयीस्कर आणि पूर्णपणे पुनर्वापर करता येणाऱ्या स्वरूपात उत्कृष्ट चव देण्यास आम्ही उत्सुक आहोत."

> बॉल आणि डाबर यांच्यातील ही भागीदारी अशा वेळी आली आहे, जेव्हा टिकाऊपणाला ग्राहकांकडून जास्त महत्त्व दिले जात आहे. जे ब्रँड्सकडून टिकाऊ पॅकेजिंगमध्ये उत्पादने ऑफर करण्याची अपेक्षा करतात. 2070 पर्यंत नेट-झिरो उत्सर्जन साध्य करण्याच्या भारत सरकारच्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने, टिकाऊ पॅकेजिंग पर्याय म्हणून अ‍ॅल्युमिनियम शीतपेय कॅनची वाढती ओळख सुरू राहणे आणि आणखी वाढणे अपेक्षित आहे.

अ‍ॅल्युमिनियमचे अनेक फायदे आहेत. एक परिपूर्ण सर्क्युलर सामग्री म्हणून, या अ‍ॅल्युमिनियम कॅनचे आंतरिक गुणधर्म न गमावता त्याचा पुनर्वापर करता येते, ज्यामुळे कचऱ्याचे प्रमाण कमी होते आणि त्याचे मूल्य टिकून राहते. याव्यतिरिक्त, पुनर्वापर केलेले अ‍ॅल्युमिनियम वापरण्यामुळे शुद्ध अ‍ॅल्युमिनियमच्या तुलनेत 95% ऊर्जा बचत होते. पुनर्वापर केलेल्या अ‍ॅल्युमिनियमचा वापर उत्पादनापासून ते विल्हेवाटापर्यंत संसाधनाचा वापर अनुकूल करू शकतो, ज्यामुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम कमी होतात. श्री. मनीष जोशी, कमर्शियल डायरेक्टर (आशिया), बॉल कॉर्पोरेशन, बॉल आणि डाबर इंडियामधील पॅकेजिंग भागीदारीबद्दल बोलताना म्हणाले, "जसजसे ग्राहक आरोग्यदायी पेयांकडे वळत आहेत आणि सोबत नेण्यासाठी सोयीस्कर पर्याय पसंत करत आहेत, तसतशी ज्यूस-बेस्ड कॅटेगरीमध्ये अ‍ॅल्युमिनियम कॅन्सची मागणी 2023 ते 2028 या कालावधीत 12% वार्षिक वाढीच्या दराने वाढेल, असा अंदाज आहे. डाबरच्या रिअल बाइट्ससाठी, ज्यामध्ये लहान फळांचे तुकडे आहेत, कॅनची रुंद उघडझाप सोपी खाण्यासाठी योग्य पर्याय ठरली."

बॉल आणि डाबर इंडिया यांच्यातील पॅकेजिंग भागीदारीवर बोलताना, बॉल कॉर्पोरेशन एशिया येथील कमर्शियल डायरेक्टर मनीष जोशी म्हणाले: "ग्राहक आरोग्यदायक पेये निवडत असल्याने आणि सोबत नेण्यासाठी सोयीस्कर पर्याय पसंत करत असल्याने, पॅकेजिंग सब्स्ट्रेट म्हणून ज्यूस आधारित श्रेणी 2023 ते 2028 दरम्यान 12% च्या वार्षिक वृद्धी दराने वाढण्याची अपेक्षा आहे.

बॉलचे 2-पीस अ‍ॅल्युमिनियम शीतपेय कॅन पूर्णपणे पुनर्वापर करता येण्याजोग्या आहेत आणि ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विविध आकारांमध्ये उपलब्ध आहेत. बॉलचे कॅन आमच्या ग्राहकांना त्यांच्या टिकाऊपणाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यात मदत करतात, तसेच 360 डिग्रीमध्ये ब्रँडिंगची संधी आणि प्रिंटमध्ये विविध नवकल्पनांसाठी जागा उपलब्ध करतात. "डाबर रिअल बाईट्समध्ये फळांचे छोटे तुकडे असतात आणि कॅनचे रुंद तोंड सहज वापरासाठी सोयीस्कर असते."

## थोडक्यात



### एमओसी कम्यूनिटी कॅन्सर सेंटरचे कल्याणी नगर येथे लोकार्पण

**पुणे (आरंभ पर्व) :** एम ओ सी कॅन्सर केयर एंड रिसर्च सेंटर या कर्करोगग्रस्तांचा प्रयास सुखकर करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या संस्थेने डिसेंबर महिन्यात आपले नवे कम्यूनिटी कॅन्सर सेंटर कल्याणी नगर- पुणे येथे रुग्णसेवेसाठी रुजू केले आहे. पुणे शहर, जिल्हा तसेच महाराष्ट्रात कॅन्सरचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. उपचारांसाठी फक्त शासकीय आणि खाजगी इस्पितळांवर विसंबून राहणे आणि तिथे असणाऱ्या अनुक्रमे- लांबच लांब रांगा, किवा न परवडणारे खर्च, रुग्णांच्या समस्यांमध्ये भर पाडणारे आहे. अशा परिस्थितीत कम्यूनिटी कॅन्सर सेंटर्स रुग्णांना अतिशय उपयोगी पडतात जिथे मोठ्या इस्पितळांइतकेच योग्य निदान, योग्य उपचार, अनुभवी कर्करोग तज्ज्ञांकरवी, रुग्णांच्या जवळच्या परिसरात आणि वाजवी दरात दिले जातात; असे एम | ओ | सी चे कर्करोगतज्ञ डॉ तुषार पाटील आणि डॉ रेशमा पुराणिक आमच्या पत्रकारांशी बोलताना म्हणाले. एम ओ सी कल्याणी नगर हे 30 बेड्सने सज्ज सेमी आय.सी.यू. युक्त कॅन्सर सेंटर असून इथे सर्व प्राइवेट मेडिकल इन्शुरन्स आणि पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य योजनेच्या लाभार्थींना उपचार घेता येणार आहेत अशी माहिती एम | ओ | सी चे कर्करोगतज्ञ डॉ अश्विन राजभोज आणि डॉ आस्मा पठाण यांनी दिली.



## भगवान श्रीकृष्ण मंदिरात वर्धापनदिन उत्साहात साजरा

**उरूळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

मंदिरामध्ये येताना भक्ताकडे मन, भक्ती, नमस्कार आणि भजन या चार गोष्टी भगवंतांनी मागितलेल्या आहेत. मंदिरामध्ये देवाला मन अर्पण करा. त्यामुळे देव प्रसन्न होईल, खरी भक्ती करा, असे प्रतिपादन श्रीरामपूर येथील भागवताचार्य संदीपाराज बाबा कपाटे यांनी देहू माळवाडी येथे केले. माळवाडी येथे तीनशे वर्षांची परंपरा असलेले श्रीकृष्ण मंदिर आहे. या मंदिराचा वर्धापनदिन तथा पंचावतार उपहार महोत्सव रविवारी विविध धार्मिक कार्यक्रमांनी आयोजित करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. श्री दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला. तसेच गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. श्रीकृष्ण मंदिरात त्रिमूर्ती मंगल स्नान करण्यात आले. त्यानंतर गीता पाठ पारायण झाले. सकाळी नऊ वाजता ध्वजारोहण, धर्मसभा आयोजित करण्यात आली. तसेच महानुभाव पंथातील विविध आचार्य श्री मराठी बाबा, आचार्य श्री पातुरकर बाबा, आचार्य श्री बायराज बाबा, आचार्य श्री.जायराज बाबा साळवाडी, पुणे जिल्हा परिषद अध्यक्ष रामचंद्र बाबा, टेंभुरकर बाबा तथा भागातून आलेल्या संत महंताचे तथा राजकीय सामाजिक शैक्षणिक तथा वारकरी महानुभाव पंथातील सर्व आध्यात्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवराची उपस्थिती लाभली. त्यानंतर दुपारी बारा वाजता पंचावतार उपहार व महाआरती झाली. भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. श्रीकृष्ण मंदिराचे हंसराज बाबा मराठे, अनिल बाबा मराठे, भगवान श्रीकृष्ण मंदिर ट्रस्ट माळीनगर यात्रा कमिटी श्रीकृष्ण मंदिर जन्मोत्सव कमिटी आणि माळवाडी ग्रामस्थ यांच्यावतीने आयोजन करण्यात आले होते.

### शहिद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशीला न्याय देण्याच्या मागणीसाठी

## रिपब्लिकन पक्षाचे तीव्र निदर्शने आंदोलन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

परभणी येथे संविधानाच्या अवमानानंतर घडलेल्या घटने संदर्भात पोलिसांनी केलेल्या कॉबिंग ओपारेशन मध्ये आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, महिला यांना घरातून उचलून अटक करण्यात आली. रविवारी यातील सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा पोलिस कोठडीत दुर्दैवी मृत्यू झाला. शहिद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशीला न्याय मिळालाच पाहिजे; दोषी पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा; कोंबींग ऑपरेशनचे आदेश देणाऱ्या पोलिसांचे निलंबन करा, जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक आणि आंबेडकरी वसाहतीमध्ये वाहनाची तोडफोड करणाऱ्या पोलिसांना निलंबित करा, सदर प्रकारणाची सीबीआय चौकशी करा आदी मागण्यांसाठी आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने प्रशासना विरोधात पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे तीव्र आंदोलन करीत निदर्शने करण्यात आली. परभणी येथील जिल्हाधिकारी कार्यालयसमोरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाच्या अवरामध्ये संविधानाची तोडफोड करून विटंबना करण्यात आली. त्यातील मुख्य आरोपी व त्या मागील कटकारस्थान करणारे यांना कठोर शिक्षा करावी त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा या हेतुने मोठे जनअंदोलन केले गेले. त्यावेळी पोलिसांनी केलेल्या कॉबिंग ओपारेशन मध्ये आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, महिला यांना घरातून उचलून अटक करण्यात आली. रविवारी यातील मूळचा पुणे जिल्ह्यातील सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा पोलिस कोठडीत दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेच्या निषेधार्थ आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने प्रशासना विरोधात पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे



शहराध्यक्ष संजय सोनावणे यांच्या नेतृत्वाखाली तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी राज्य सचिव बाळासाहेब जानराव, राज्य संघटक सचिव परशुराम वाडेकर, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, माजी नगरसेवक अशोक कांबळे, माजी शहराध्यक्ष महेंद्र कांबळे, संगीता आठवले, विशाल शेवाळे, माजी नगरसेविका हिमाली कांबळे, बसवराज गायकवाड, शाम सदाफुले, राहुल डंबाळे, निलेश अल्हाट, बापूसाहेब भोसले, यशवंत नडगम, मिना मालटे, संदीप धांडोरे, अविनाश कदम, चांदणी गायकवाड, मिनाज मेनन, माहादेव कांबळे, संतोष खरात, मुन्ना बक्षशेख, मंगल रासगे, राजेश गाडे, एस. बी. गायकवाड, भारत भोसले, विनोद टोपे, आशीष भोसले, विरेन साठे, रवी अवसरमल, अक्षय अवसरमल, अमित सोनवणे, सुन्नाबी शेख, संतोष गायकवाड, सुरज गायकवाड, रामभाऊ कर्वे, शंशाक माने, करण सोरटे, रविन्द्र कांबळे, सुशील मंडल, रोहित कांबळे, युवक आघाडीचे महाराष्ट्र राज्य संघटक उमेश कांबळे आदी यावेळी उपस्थित होते.

परशुराम वाडेकर म्हणाले, परभणी येथे झालेल्या पोलिसांच्या कॉबिंग ऑपरेशन मध्ये पुण्यातील सोमनाथ सूर्यवंशी याचा मृत्यू झाला आहे. पोलिसांनी जे कॉबिंग ऑपरेशन केले ते केवळ दलित व बौद्ध वस्ती असलेल्या ठिकाणी ठरवून केलेले आहे. जय भीम लिहिलेल्या गाड्या पोलिसांनी फोडलेल्या आहेत. कॉबिंग ऑपरेशन दरम्यान जखमी झालेल्या लोकांना पोलिसांनी रुग्णालयात न नेता पोलिस ठाण्यात डांबून ठेवले. सोमनाथ सूर्यवंशी याचा मृत्यू हा हृदयविकाराच्या झटक्याने न होता पोलिसांच्या अमानुष मारहाणीमुळे पोलिस कोठडीत झाला. मात्र सरकार हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करीत आहे.

# जिल्हा परिषद रत्नागिरी आणि रेनट्री फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार

### रत्नागिरीच्या शाश्वत भविष्याला चालना देणारी भागीदारी जिल्ह्यात राबविणार

- पर्यावरण, जलसंधारण आणि समुदाय कल्याणावर लक्षकेंद्री योजना




**रत्नागिरी (दै. आरंभ पर्व)**

जिल्हा परिषद रत्नागिरी आणि रेनट्री फाउंडेशन यांनी रत्नागिरी जिल्ह्याच्या सर्वांगीण आणि एकात्मिक विकासासाठी पर्यावरण संरक्षण, जलसंधारण विकास, ग्रामीण उपजीविका आणि समाज कल्याण या क्षेत्रांमध्ये एकत्र काम करण्यासाठी आज सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. या उपक्रमात सर्वसमावेशक विकास आणि मानसिक आरोग्यावर विशेष भर दिला जाणार आहे. महिला आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांना प्राथमिक भागधारक म्हणून प्राधान्य दिले जाईल, तसेच स्थानिक संस्थांचे सक्षमीकरण करण्यावरही विशेष लक्ष दिले जाणार आहे. याबाबत मत व्यक्त करताना श्री. कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषद रत्नागिरीचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले, "रत्नागिरीमध्ये, आम्ही आमच्या समुदायांची प्रगती आणि विकास सुनिश्चित करून संपूर्ण जिल्ह्यात विविध विकासात्मक आणि शाश्वत उपक्रम यशस्वीपणे राबवत आहोत. रेनट्री फाउंडेशनसोबतची ही भागीदारी आमच्या चालू असलेल्या प्रयत्नांना अधिक कौशल्य आणि अचूक दृष्टीकोन देईल, ज्यामुळे आम्हाला आमचा प्रभाव आणखी वाढवण्यास मदत होईल. सोबतच या सामंजस्य करारामुळे नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करताना समाजातील विकासाला चालना दिल्याने आपण जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक वेगाने कार्य करू शकतो. या एकत्रित प्रयत्नांमधून आम्ही शाश्वत परिसंस्थेला चालना देऊन आणि समुदायांना सक्षम बनवून, रत्नागिरीला केवळ महाराष्ट्रातच नाही, तर संपूर्ण भारतात एक आदर्श जिल्हा बनवण्याच्या उद्दिष्टासाठी वचनबद्ध आहोत, यासाठी आम्ही एकत्रितपणे काम करत आहोत."

> **रेनट्री फाउंडेशनबद्दल :** २०१८ मध्ये दांडेकर कुटुंबाने स्थापन केलेली रेनट्री फाउंडेशन मानवी आणि नैसर्गिक अशा दोन्ही प्रकारच्या शाश्वत, मजबूत आणि समृद्ध परिसंस्था निर्माण करण्यासाठी कार्यरत आहे. आमचा उद्देश पर्यावरणाच्या देखभालीसाठी समुदायांना प्रोत्साहित करणारे नाविन्यपूर्ण व सामुदायिक उपक्रम राबवून, एक असे जग निर्माण करणे आहे जे जे मानसिकतेत बदल घडवून आणतील आणि प्रणालीगत बदलाकडे नेतील. हवामान, समुदाय आणि जैवविविधता या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणारे आमचे उपक्रम संयुक्त राष्ट्रसंघाने (UN) ठरवलेल्या १७ शाश्वत विकास उद्दिष्टांची (SDGs) पूर्तता करण्याचा प्रयत्न करतात. आमच्या एकात्मिक योजना जलसंधारण, जैव विविधता संरक्षण, स्वच्छ ऊर्जा, उपजीविका, समुदायाचे मानसिक आरोग्य, आणि सर्वसमावेशकतेवर भर देतात. आम्ही भारताच्या पश्चिम घाट क्षेत्रात काम करतो, ज्याला UNESCO ने जागतिक जैवविविधतेच्या शीर्ष दहा महत्त्वपूर्ण स्थळांपैकी एक म्हणून मान्यता दिली आहे अधिक माहितीसाठी, कृपया येथे भेट द्या: https://theraintree.org/

यावेळी रेनट्री फाउंडेशनच्या संस्थापक सौ. लीना दांडेकर म्हणाल्या, "रेनट्री फाउंडेशनमध्ये आमचे उद्दिष्ट नेहमीच शाश्वत, सर्वसमावेशक विकासाच्या माध्यमातून सक्षम समाज आणि शाश्वत परिसंस्था निर्माण करणे हे आहे. पुण्यातील वेल्हे येथे रेन ट्री फाऊंडेशनने दिलेल्या योगदानामुळे स्थानिक समुदायांना सहभागी करून घेतल्याने होणारे सकारात्मक बदल दिसून आले आहेत. जिल्हा परिषद रत्नागिरीसोबत भागीदारी केल्याचा आम्हाला अभिमान वाटतो आणि आम्हाला विश्वास आहे की, एकत्रितपणे आम्ही वेल्हेमध्ये मिळालेल्या यशाची पुनरावृत्ती मोठ्या प्रमाणावर रत्नागिरीत करू शकतो, ही भागीदारी आमच्या शास्त्री नदी खोऱ्यावर केंद्रित असलेल्या दीर्घकालीन प्रकल्पाचा एक भाग आहे."

त्यांनी पुढे सांगितले, "आम्हाला विश्वास आहे की ही भागीदारी जिल्ह्यातील शाश्वत विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. जैवविविधतेचे संरक्षण करणे, जलस्रोतांचे सक्षमीकरण करणे, आणि ग्रामीण जीवनमान सुधारणे तसेच सर्वसमावेशकता आणि समुदाय कल्याणाला प्रोत्साहन देणे हे आमचे ध्येय आहे. आम्ही रत्नागिरीला एक समृद्ध आणि विकासात्मक परिसंस्था बनवण्याचा प्रयत्न करीत आहोत, जिथे समुदाय आणि निसर्ग एकोप्याने एकत्र राहू शकतील आणि एक प्रेरणादायक उदाहरण निर्माण करतील."

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
बुधवार, दि. १८ डिसेंबर २०२४


## थोडक्यात



### यूपी योद्धाज संघाचा हरयाणा स्टीलर्स संघाला पराभवाचा धक्का

**पुणे (आरंभ पर्व) :** प्रो कबड्डी लीग मध्ये उत्कृष्ट सांघिक कौशल्य दाखवीत यूपी योद्धाज संघाने हरियाणा स्टीलर्स संघावर 31-24 असा सनसनाटी विजय नोंदविला आणि प्रो कबड्डी लीग मध्ये प्ले ऑफच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले. मध्यंतराला युपी योद्धाज संघाकडे दोन गुणांची आघाडी होती. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील बॅडमिंटन हॉलमध्ये सुरु असलेल्या या स्पर्धेत साखळी गटात गुण तालिकेत अव्वल स्थानावर असलेल्या हरियाणा संघाने यापूर्वी झालेल्या 20 लढतीतील पैकी 15 लढती जिंकून प्ले ऑफ मध्ये या अगोदरच स्थान घेतले आहे. त्यामुळे त्यांच्या दृष्टीने उर्वरित साखळी सामने म्हणजे प्ले ऑफ पूर्वीची रंगीत तालीमच आहेत. प्ले ऑफ मधील सामन्यांसाठी आतापासूनच रणनीती आखण्याच्या दृष्टीने हे साखळी सामने त्यांना महत्त्वाचे आहेत. त्यांचा प्रतिस्पर्धी असलेला यूपी योद्धाज संघास प्ले ऑफ मध्ये स्थान मिळवण्याच्या संधी आहेत. त्यामुळेच आजची लढत त्यांच्या दृष्टीने महत्त्वाची होती. आतापर्यंत त्यांनी 19 सामन्यांपैकी दहा सामने जिंकले आहेत. सामन्याच्या सुरुवातीपासूनच दोन्ही संघांमध्ये आघाडी घेण्यासाठी सतत संघर्ष दिसून येत होता. दहाव्या मिनिटाला हरियाणा संघ 6-5 असा आघाडीवर होता. मात्र यूपीच्या खेळाडूंनी जिद्द सोडली नाही. 7-10 अशा पिछाडीवरून त्यांनी 18 व्या मिनिटाला लोण चढविला व 13-11 अशी आघाडी घेतली. मध्यंतराला त्यांच्याकडे 15-13 अशी नाममात्र आघाडी होती. उत्तरार्धातही यूपीच्या खेळाडूंनी जोरदार चढाया आणि भक्कम पकडी याच्या जोरावर आणखी एक लोण नोंदविण्यात यश मिळविले. त्यामुळे त्यांच्याकडे 23-14 अशी मोठी आघाडी आली. 30 व्या मिनिटाला त्यांच्याकडे 24-16 असे आधिक्य होते. शेवटचे पाच मिनिटे बाकी असताना त्यांनी 28-19 अशी आघाडी घेतली होती. प्ले ऑफ मधील स्थान यापूर्वी निश्चित झाल्यामुळे हरियाणा संघ आज फारसा गांभीर्याने खेळला नाही. अर्थात यूपी योद्धाज संघांच्या खेळाडूंनी आज प्ले ऑफ मध्ये स्थान मिळवायचे हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवत खेळ केला. युपी योद्धा कडून सुमित याने उत्कृष्ट पकडी केल्या तर भवानी रजपूत व भरत या दोघांनी पल्लेदार चढाया केल्या. हरियाणा संघाकडून शिवम पठारे व विशाल ताटे यांनी जोरदार चढाया केल्या.

### ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र भोळे यांना पुरस्कार प्रदान



**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** गोल्डन इरा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड च्या वतीने देण्यात येणारा यावर्षीचा यावर्षीचा गोल्डन स्टार ऑफ द इयर 2024 आणि इंटरनॅशनल ह्युमन राइट्स अवॉर्ड सामाजिक कार्यकर्ते डॉ.रवींद्र भोळे यांना प्रदान करण्यात आला. कौशल्य विकास व उद्यमशीलता मंत्रालय, सेंट्रल व्हिजिलन्स कमिशन, रसायन एवं उर्वरक मंत्रालय, एमएसएमइ उद्यम मंत्रालय, स्वास्थ्य एवं परिवार कल्याण मंत्रालय भारत सरकार सलग्नित संस्था गोल्डन इरा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड च्या वतीने डॉ मनिष शर्मा ह्यांनी वरील पुरस्कार ज्येष्ठ समाजसेवक, प्रवचनकार अपंग सेवक, अध्यात्मिक, धार्मिक क्षेत्रातील कार्यकर्ते डॉ.रवींद्र भोळे यांना प्रदान केला. पद्मश्री डॉ.मणीभाई देसाई मानव सेवा ट्रस्ट, पद्मश्री डॉ.मणीभाई देसाई प्रतिष्ठानच्या वतीने त्यांनी अनेक समाज उपयोगी उपक्रम राबवले आहेत.

# दिव्यांग विद्यार्थ्यांना आनंद व सन्मान देणारा 'जल्लोष' कार्यक्रम

## प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन; 'सूर्यदत्त'मध्ये दिव्यांग मुलांसाठी 'जल्लोष २०२४'चे आयोजन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"दिव्यांग विद्यार्थ्यांत कमालीची गुणवत्ता असते. त्यांना योग्य व्यासपीठ, संधी आणि प्रोत्साहन दिले, तर हे विद्यार्थी कौतुकास्पद कामगिरी करतात. सूर्यदत्त परिवारातील विद्यार्थी व दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये आपुलकीचा स्नेहबंध निर्माण व्हावा, त्यांच्या मनात सामाजिक भावना व संवेदनशीलता रुजावी, यासाठी 'जल्लोष'सारखे कार्यक्रम उपयुक्त ठरतात," असे प्रतिपादन सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी केले.

सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या एज्यु-सोशियो कनेक्ट इनिशिएटिव्ह अंतर्गत दिव्यांग मुलांसाठी 'जल्लोष 2024' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी गुणी मुलांचे कौतुक करताना प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया बोलत होते. प्रसंगी बालकल्याण संस्थेचे क्रीडा शिक्षक अशोक नांगरे, 'सूर्यदत्त'च्या उपाध्यक्ष सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, सूर्यदत्त नॅशनल स्कूलच्या मुख्याध्यापिका शीला ओका, सामाजिक कार्यकर्त्या सीमा दाबके, 'सर्वश्रेष्ठ दिव्यांगजन पुरस्कार 2024'च्या मानकरी प्रियंका दबडे आदी उपस्थित होते.

या सांस्कृतिक कार्यक्रमात गाणी, नृत्याविष्कार, जादूचे प्रयोग, फुग्यांची उधळण आणि भरपूर खाऊ खात विद्यार्थ्यांनी आनंद लुटला.

'सूर्यदत्त'च्या बावधन कॅम्पसमधील बंन्सीरत्न सभागृहामध्ये झालेल्या या कार्यक्रमाचे हे चौदावे वर्ष होते. दिव्यांग मुलांना मुख्य प्रवाहात सहभागी करून घेत त्यांचे जीवन अधिक सहज व सोपे करण्याचा उद्देश या कार्यक्रमाचा आहे. 'सूर्यदत्त'च्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत दिव्यांग बांधवाना स्वतः बनवलेले कागदी पंखे देऊन स्वागत केले. या कार्यक्रमात विविध 18 संस्थांचे 600 विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले.

वैष्णवी जगताप (शिवछत्रपती पुरस्कार: सहाय्यक क्रीडा अधिकारी), चिंतामणी राऊत (कॉमनवेल्थ आतंरराष्ट्रीय स्पर्धा सुवर्णपदक), सुप्रिया गायकर (राष्ट्रीय फ्लोअर बॉल स्पर्धा सुवर्णपदक), अमित घारे (राष्ट्रीय स्पेशल ऑलिम्पिक व्हॉलीबॉल स्पर्धा सुवर्णपदक), अक्षय ठकार (राष्ट्रीय स्पेशल ऑलिम्पिक टेबल टेनिस स्पर्धा सुवर्णपदक), हर्ष बाबर (राष्ट्रीय स्पेशल ऑलिम्पिक लॉन टेनिस स्पर्धा सुवर्णपदक), साकेत देवचक्के (राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धा सुवर्णपदक), पायल राजीव वसे (कर्णबधीर) व्हेरी स्पेशल आर्ट इंडिया चित्रकला स्पर्धा प्रथम क्रमांक, सम्यक महेश कांबळे (कर्णबधीर) व्हेरी स्पेशल आर्ट इंडिया चित्रकला स्पर्धा द्वितीय क्रमांक, श्रावण राममूर्ती नायडू (ऑटिझम) व्हेरी स्पेशल आर्ट इंडिया चित्रकला स्पर्धा द्वितीय क्रमांक मिळाला.

सीमा दाबके म्हणाल्या, "नवनवीन गोष्टी शिकण्याची संधी देणारे एक व्यासपीठ आहे. यामध्ये सर्वच मुले खूप उत्साहाने सहभागी होतात. दिव्यांगांना सामान्य विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्यांचे भावविश्व उलगडता येते." प्राजक्ता पाटकर यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

## उड्डाण पुलाच्या खांबासाठी भूसंपादन करा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कात्रज चौकातील उड्डाणपुलाच्या कामासाठी मागील काही दिवसांपासून चौक बंद केला आहे, प्रत्यक्षात या पुलाच्या खांबाच्या उभारणीसाठी आवश्यक एक जागाच अद्याप महापालिकेच्या ताब्यात आली नसल्याची सद्यःस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी संबंधित जागेचे तातडीने भूसंपादन करण्याचा आदेश पथ व भूसंपादन विभागाला दिला आहे. महापालिकेकडून कात्रज चौकामध्ये उड्डाण पूल उभारण्यात येत आहे. या कामासाठी महापालिकेकडून येथील चौक बंद केला आहे. परंतु, पुलासाठी आवश्यक खांब उभारण्याचे काम सध्या सुरु आहे. मात्र त्यासाठी एक जागा महापालिकेच्या ताब्यात आलेली नाही. सोमवारी महापालिकेत कात्रज-कोंढवा रस्त्याच्या कामाचा आढावा घेण्यासाठी तसेच कोंढव्याच्या दिशेने उड्डाण पूल उतरण्यासाठी लागणाऱ्या जागेसाठी आयुक्त डॉ. भोसले यांनी सात जागा मालकांची महापालिकेत बैठक घेतली.

## विमा प्रतिनिधींचे 17 डिसेंबरला सत्याग्रह आंदोलन : छाजेड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नगर- भारतीय आयुर्विमा महामंडळाने जुन्या सर्व योजना बंद केल्या असून मार्केटमध्ये विक्रीसाठी आणलेल्या नवीन योजनांमध्ये अनेक किचकट तरतुदी, काही संभाव्य तरतुदी, त्रुटींमुळे विमाप्रतिनिधींना अडचणीचे ठरत आहे. नवीन तरतुदींमुळे योजना ग्राहकांना फायदेशीर आहे ही चांगलीच गोष्ट आहे पण विमा प्रतिनिधींना मात्र त्या तरतुदी घातक आहेत याबाबत पुणे येथील भारतीय आयुर्विमा महामंडळाला देखील निवेदन देऊन घातक असलेल्या परिपत्रकाचा विरोध संपूर्ण



देशभर विमा प्रतिनिधी करीत आहेत त्या अनुषंगाने मंगळवार दिनांक17 डिसेंबर रोजी पुणे येथे विभागीय कार्यालया समोर सत्याग्रह आंदोलन नगरचे विमा प्रतिनिधी केले आहे.अशी माहिती ऑल इंडिया लाइफ इन्शुरन्स एजंटस् फेडरेशन ऑफ इंडिया पुणे विभागाचे विभागीय संघटक सचिव प्रमोदकुमार छाजेड यांनी दिली. याबाबत श्री छाजेड यांनी तसे निवेदन नुकतेच पुणे विभागीय कार्यालयाला दिले असून त्यामध्ये त्यांनी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की विमा प्रतिनिधी यांनी पॉलिसी विक्री केल्यानंतर जर ग्राहकाना काही अडचणीमुळे पुढील वर्षाचे हप्ते न भरल्यास व पॉलिसी सरेंडर केल्यास विमा प्रतिनिधीला दिलेले कमिशन पुन्हा वसुल करण्याची घातक तरतूद करण्याचा छुपा अजेंडा घेवून आयुर्विमा महामंडळ काम करत आहे, अशी आमची भावना झाली असून तसा स्पष्ट उल्लेख या परिपत्रकात जरी नसला तरी पडद्यामागून या हालचाली चालू असल्याच्या दिसून येत आहेत.

## 'पीडी' ग्राहकांच्या वीजबिल थकबाकीमुक्ती 'अभय' योजनेला उरले आता 14 दिवस

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




वीजबिल थकबाकीमुळे कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित (पर्मनंट डिस्कनेक्टेड) असलेल्या ग्राहकांना केवळ मूळ थकबाकीच्या रकमेचा एकरकमी किंवा सहा हप्त्यांत भरणा करून थकबाकीमुक्ती व पुनर्वीजजोडणीची संधी महावितरण अभय योजनेतून उपलब्ध झाली आहे. या योजनेला केवळ 14 दिवस उरले असून आतापर्यंत पुणे प्रादेशिक विभागातील 23 हजार 779 लघु व उच्चदाब थकबाकीदार ग्राहकांनी सहभाग नोंदविला आहे. त्यातील 20 हजार 546 वीजग्राहकांनी 30 कोटी 20 लाख रुपयांच्या मूळ थकबाकीचा भरणा केला आहे.

थकीत वीजबिलांमुळे दि. 31 मार्च 2024 पर्यंत कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांसाठी महावितरणने अभय योजना सुरु केली आहे. कृषी व सार्वजनिक पाणीपुरवठा योजना वगळून उर्वरित लघु व उच्चदाब वर्गवारीतील सर्व घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व इतर वीजग्राहकांसाठी ही योजना आहे. यामध्ये केवळ मूळ थकबाकीचा भरणा केल्यास संपूर्ण 100 टक्के व्याज व विलंब आकाराची (दंड) रक्कम माफ होणार आहे. तसेच मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा केल्यास लघुदाब ग्राहकांना आणखी 10 टक्के तर उच्चदाब ग्राहकांना आणखी 5 टक्के सूट मिळत आहे. यासोबतच मूळ थकबाकीची सुरवातीला 30 टक्के रक्कम भरून उर्वरित 70 टक्के रक्कम व्याजमुक्त सहा हप्त्यांत भरण्याची देखील सोय आहे. महावितरण अभय योजनेची मुदत येत्या दि. 31 डिसेंबरला संपणार आहे.

अभय योजनेमध्ये पुणे प्रादेशिक विभागात आतापर्यंत सहभागी 20 हजार 546 वीजग्राहकांनी 30 कोटी 20 लाख रुपयांच्या मूळ थकबाकीचा भरणा केला आहे. यात पुणे जिल्ह्यात 8626 ग्राहकांनी 18 कोटी 76 लाख, सातारा जिल्ह्यात 994 ग्राहकांनी 1 कोटी 51 लाख, सोलापूर जिल्ह्यात 3328 ग्राहकांनी 2 कोटी 88 लाख, कोल्हापूर जिल्ह्यात 4043 ग्राहकांनी 4 कोटी 74 लाख आणि सांगली जिल्ह्यातील 3555 ग्राहकांनी 2 कोटी 31 लाख रुपयांच्या मूळ थकबाकीचा भरणा केला आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार, वीजबिलांची थकबाकी असलेल्या एखाद्या जागेची मालकी बदलल्यानंतर देखील नवीन जागामालक किंवा ताबेदारांना थकबाकीची रक्कम भरावी लागेल. त्यामुळे जागा वापरात असो किंवा नसो, पण त्या जागेवर वीजबिलांची थकबाकी राहणार असल्यामुळे या थकबाकीतून मुक्त होण्याची संधी आहे. त्यामुळेच सध्या विजेची गरज नसतानाही 11 हजार 657 ग्राहकांनी या योजनेत सहभाग घेतला आहे तर 7920 ग्राहकांनी पुनर्विजजोडणी आणि 4202 ग्राहकांनी नवीन वीजजोडणीची मागणी केली आहे.

# 'प्लॅटिनम लव्ह बँड'सह बांधीलकीचा हंगाम साजरा करा


## प्रेमाप्रमाणेच दुर्मिळ, मौल्यवान, स्थिर उत्सव

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

हिवाळ्यातील थंड वाऱ्याची झुळूक प्रेमाने भरलेली असते, जी जोडप्यांना त्यांच्या अनोख्या वचनबद्धतेचा उत्सव साजरा करण्यासाठी एक व्यासपीठ तयार करते. लग्नाची घंटा वाजत असताना आणि लग्नाच्या वाढदिवसाच्या योजना आकार घेताना स्पष्ट होते की प्रेम, त्याच्या सर्व स्वरूपात व्यक्त होणार आहे. जोडप्यांमधील प्रेमाची भावना अशावेळी पूर्णपणे अलिखित असते आणि जी एकमेकांच्या चुका आणि विक्षिप्त सवयींचे स्वागत करते. संशय आणि भीतीवर हे जोडपे एकत्रितपणे मात करतात, त्यांच्या प्रेमाच्या परिवर्तनीय सामर्थ्याने भविष्यात एकत्रित पाऊल टाकतात. अशा निर्णायक क्षणी फक्त एकच धातू अशा नातेसंबंधाची खोली आणि दुर्मिळता प्रतिबिंबित करू शकतो, तो म्हणजे प्लॅटिनम. प्लॅटिनम हा त्यांच्या एकत्र प्रवासाइतकाच दुर्मिळ आणि मौल्यवान आहे.

प्लॅटिनम हा ताऱ्यांपासून उगम पावलेला, दोन अब्ज वर्षांपूर्वी उल्का कोसळून पृथ्वीवर आलेला धातू आहे. हा मौल्यवान धातू जगभरातील काही निवडक ठिकाणी आढळतो आणि सोन्यापेक्षा 30 पट दुर्मिळ आहे. प्लॅटिनमची अनोखी ताकद हे सुनिश्चित करते की त्याचे स्वरूप बदलत नाही किंवा त्याचा नैसर्गिक पांढरा रंगही गमावत नाही. त्यामुळे ते खरोखर एक प्रकारे प्रेमातील लवचिकता आणि स्थिरता दर्शवते. अतुटता आणि शाश्वतता हे प्रेमाचे प्रतिक आहे, त्याप्रमाणेच प्लॅटिनम लुप्त न होता टिकून राहतो.

95 टक्के शुद्ध आणि अपवादात्मक दुर्मिळ प्लॅटिनमपासून तयार केलेले 'प्लॅटिनम लव्ह बँड' केवळ दागिनेच नाहीत; ते प्रेमाचे अमूल्य प्रतीक आहे. हे बँड आधुनिक नातेसंबंधांची मूल्ये साजरी करतात, तसेच एकमेकांच्या व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन करणे, परस्पर यश साजरे करणे आणि जीवनातील जबाबदाऱ्या समानतेने एकत्रित करतात. प्रत्येक बँडची विशिष्ट पोत, प्रवाही रेषा आणि मोहक आकृतिबंध ही तत्त्वे सुंदरपणे प्रतिबिंबित करतात. तुम्ही कमीतकमी आणि स्लीक स्टाइल किंवा कालातीत




सुरेखपणाला प्राधान्य देत असला तरीही, प्लॅटिनम लव्ह बँड्सचा वैविध्यपूर्ण संग्रह असे काहीतरी ऑफर करतो जो प्रेमाच्या प्रवासासाठी वचनबद्ध असलेल्या सर्व जोडप्यांना मनापासून प्रोत्साहन देईल.

प्लॅटिनम, त्याचा समृद्ध वारसा आणि समकालीन आकर्षणासह, आजच्या डिझाइन ट्रेंडला तुमच्या वैयक्तिक प्रेमकथेचे वर्णन करणाऱ्या अद्वितीय तुकड्यांमध्ये उत्तम प्रकारे रूपांतरित करतो. प्लॅटिनम लव्ह बँड निवडणे म्हणजे आपल्या एकत्रित भविष्यात सुंदर राहण्यासाठी डिझाइन केलेले आधुनिकतेसह परंपरेचे मिश्रण करणारे प्रेमाचे प्रतीक निवडणे होय. तुम्हाला आणि तुमच्या प्रिय व्यक्तीला तुमच्या नातेसंबंधाची व्याख्या करणारे महत्त्वाचे क्षण लक्षात ठेवायचे आहेत, विशेषत: जेव्हा तुम्हाला हे समजते की हे प्रेम खरोखरच टिकणार आहे, तेव्हा 'प्लॅटिनम लव्ह बँड' हे तुमच्यातील एकत्रितपणाचे कायमचे प्रतीक बनू द्या.

**कायम टिकणारी वचने :** ज्या क्षणी तुम्हाला कळेल की तुमचे प्रेम एक स्थिर खडक आहे, ज्यावर तुम्ही अनिश्चिततेच्या काळातही विसंबून राहू शकता. तेव्हा तुम्हाला जाणीव होईल की तुम्हाला असे प्रेम सापडले आहे जे खरोखर दुर्मिळ आहे. विविध आकृतिबंधांसह डिझाइन केलेले हे लव्ह बँड तुम्हाला तुमच्या एकमेकांवरील अतूट विश्वासाची आठवण करून देतात. आयुष्य कितीही वेळा चढउतार आले तरी तुमचे प्रेम कायम असते. प्लॅटिनममध्ये तयार केलेला, अतुलनीय ताकदीचा एक धातू जो त्याला अत्यंत दुर्मिळ बनवतो, हे प्लॅटिनम लव्ह बँड तुमच्या प्रेमाच्या ताकदीशी पूर्णपणे जुळतात. प्लॅटिनम इतकेच दुर्लभ प्रेम लाभते.

**सुसंगत हृदय :** ज्या क्षणी तुम्हाला समजेल, की तुम्ही एकमेकांच्या स्वप्नांचा आणि विश्वासांना प्रतिबिंबित करता, तेव्हा तुम्हाला कळेल की तुम्हाला एक प्रेम सापडले आहे जे खरोखर दुर्मिळ आहे. हे प्रेम बँड एकमेकांच्या आरशातील प्रतिमा आहेत, जे एकमेकांना आधार देऊन तुम्ही एकत्र कसे वाढता हे प्रतिबिंबित करतात.

मौल्यवान दागिन्यांमधील शुद्धतेच्या सर्वोच्च मानकांपैकी एक 95 टक्के शुद्ध प्लॅटिनमपासून बनलेले हे दागिने खरोखर त्यापैकीच एक आहेत. हे प्लॅटिनम लव्ह बँड तुमच्या अतूट बंधनाचे कायम टिकणारे प्रतीक बनू द्या, प्लॅटिनम इतकेच दुर्लभ प्रेम कायम राहू द्या.

**समतोल आनंद :** ज्या क्षणी तुम्हाला जाणवेल की तुमचा हा प्रवास अखंडपणे एक सुसंवादी आश्रयस्थान तयार करण्यासाठी एकत्र आला आहे, तेव्हा तुम्हाला एक प्रेम सापडले आहे जे खरोखर दुर्मिळ आहे, अशी जाणीव होईल. हे प्रेम बँड द्वैताचे प्रतीक आहेत. ते तिच्या अंगठीवरील चमकदार पोत आणि साधी रत्नजडित फिनिश एकत्र करतात, तसेच प्रेमाचे प्रतीक असलेल्या सुंदर मध्यवर्ती आकृतिबंधांमध्ये विलीन होतात. ते तुमचे दोन्ही मार्ग एका आवडीच्या ठिकाणी विलीन होण्याचे योग्य प्रकारे प्रतिनिधित्व करतात. प्लॅटिनम हा खगोलीय धातू आहे जो अब्जावधी वर्षांपूर्वी झालेल्या उल्कापातामुळे पृथ्वीवर आला होता, जो खरोखर दुर्मिळ आहे. या प्लॅटिनम लव्ह बँड्सना तुमच्या एकत्रित प्रवासाचा पुरावा म्हणून काम करू द्या. प्लॅटिनम इतकेच दुर्लभ प्रेम बनू द्या.

संकेतस्थळ: https://platinumdaysoflove.com/

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com
• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.